# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र.९२ दिनांक:- ०९/०४/२०२१

## वाहन चोरास ६ गाडयासह ताब्यात घेऊन ४ गुन्हे उघडकिस आणण्यास वालीव गुन्हेप्रकटीकरण शाखेस यश

वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ३५२/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे दाखल वाहन चोरीच्या गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेत असतांना तांत्रिक माहीती व गुप्त बातमीव्दारे माहीती घेऊन वाहन चोरी करणारा आरोपीत नामे. विमलेश बेचु वर्मा वय ३१ वर्षे रा.गौंडा, राज्य-उत्तरप्रदेश आरोपीत यास दिनांक ०३.०४.२०२१ अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले मोटार सायकल हस्तगत केली.

आरोपीकडे अधीक विचारपुस केली असता त्याने वालीव, तुळींज, मिरारोड व मुंबई परीसरातुन वाहन चोरी केल्याची कबुली देवुन चोरीच्या ६ मोटार सायकल काढुन दिल्या.

आरोपी याचे कडुन वालीव पोलीस ठाण्याचे ३ मोटार सायकल, तुळींज पोलीस ठाण्याचे १ मोटार सायकल व मिरारोड , मुंबई परीसरातील २ मोटार सायकल असे एकुण ६ वाहन १,३५,०००/- रुपये किंमतीच्या हस्तगत करण्यात आले असुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १) | वालीव पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ३५२/२०२१ भादविस कलम ३७९ |
| २) | वालीव पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ३५५/२०२१ भादविस कलम ३७९ |
| ३) | वालीव पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ३६३/२०२१ भादविस कलम ३७९ |
| ४) | तुळीज पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ४९४/२०२१ भादविस कलम ३७९ |

सदरची कामगीरी श्री.प्रशांत वाघुंडे,पोलीस उपायुक्त, परीमंडळ-३ तसेच श्री अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त,तुळींज यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब कारांडे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/ ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मुकेश पवार, योगश देशमुख, पो.ना/ किरण म्हात्रे, राजेंद्र फड, अनिल सोनवणे, सतिष गांगुर्डे, पो.अंम./ विनेश कोकणी , बालाजी गायकवाड, सचिन बळीद, गजानन गरीबे यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner